(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)

**<u>वनजमिन-नंदुरबार</u>**

वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड, मुंबई यांना राज्य महामार्ग क्र.१, शहादा ते धडगांव (८२/२०० कि.मी. ते १५३/९०० कि.मी.) च्या कडेने भूमिगत ऑप्टीकल फायबर केबल लाईन टाकण्याकरिता ०.९७५ हेक्टर राखीव वनजमिन वळती करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन आदेश क्रमांकः एफएलडी-१६अ१८/प्र.क्र.१७२/फ-१०**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक: २१/१२/२०१८

**वाचा :-**

१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१७/एनसी/२/आयडी-१२५९८/(३०)/२४८/२०१८-१९, दिनांक २७/०४/२०१८.

२) शासन आदेश समक्रमांक, दिनांक २३/०५/२०१८.

३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१७/एनसी/२ /आयडी-१२५९८/(३०)/१४३७/२०१८-१९, दिनांक १९/१०/२०१८.

**प्रस्तावना :-**

मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड, मुंबई यांनी राज्य महामार्ग क्र.१, शहादा ते धडगांव (८२/२०० कि.मी. ते १५३/९०० कि.मी.) च्या कडेने भूमिगत ऑप्टीकल फायबर केबल लाईन टाकण्याकरिता ०.९७५ हेक्टर राखीव वनजमिन वळती करणेचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावास वरील अ.क्र.२ येथील शासन आदेशान्वये तत्वत: मंजूरी देण्यात आली आहे. त्यातील अटींची पूर्तता केल्यानंतर या प्रस्तावास अंतिम मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन आदेश :-**

१. भारत सरकारच्या आदेश क्रमांक, एफ.नं.११-९/९८-FC, दिनांक १६/१०/२००० आणि ०७/०९/२०१५ अन्वये राज्यांना दिलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, अ.क्र.२ येथील शासन आदेशान्वये वन (संवर्धन) अधिनियम, १९८०, कलम-२ (ii) अंतर्गत मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड, मुंबई यांना राज्य महामार्ग क्र.१, शहादा ते धडगांव (८२/२०० कि.मी. ते १५३/९०० कि.मी.) च्या कडेने भूमिगत ऑप्टीकल फायबर केबल लाईन टाकण्याकरीता ०.९७५ हेक्टर राखीव वनजमिन वळती करण्याबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास **तत्वत: मंजूरी** प्रदान केली होती.

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वरील अ.क्र.३ येथील पत्रान्वये वरील तत्वत: मंजूरी आदेशातील अटींचा अटीपूर्तता अहवाल शासनास सादर

केला आहे. सदर अटीपूर्तता अहवाल विचारात घेऊन तसेच वरील परिच्छेदात नमूद केलेल्या भारत सरकारच्या आदेशान्वये राज्यांना दिलेल्या अधिकारांचा वापर करुन, शासन याद्वारे, वन (संवर्धन) अधिनियम, १९८०, कलम-२ (ii) अंतर्गत राज्य महामार्ग क्र.१, शहादा ते धडगांव (८२/२०० कि.मी. ते १५३/९०० कि.मी.) च्या कडेने भूमिगत ऑप्टीकल फायबर केबल लाईन टाकण्याकरीता ०.९७५ हेक्टर राखीव वनजमिन वळतीकरण्याबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१७/एनसी/२/आयडी-१२५९८/(३०)/२४८/२०१८-१९, दिनांक २७/०४/२०१८ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावास **अंतिम मंजूरी** देत आहे. वनजमिनीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| अनु. क्र. | गावाचे नाव | जिल्हा | वनक्षेत्राचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सर्व्हे नंबर | लांबी × रुंदी (मीटर मध्ये) | क्षेत्रफळ (Sq.m.) | क्षेत्रफळ (हेक्टर मध्ये) | वैधानिक दर्जा |
| १. | दरा | नंदुरबार | ५२५, ३२३ | ८५००×०.३० | २५५० | ०.२५५ | राखीव वने |
| २. | घाटली | | ३१७, ३३१ | ४०००×०.३० | १२०० | ०.१२० | |
| ३. | काकर्दा | | ३१३, ३१४, ३११ | ९५००×०.३० | २८५० | ०.२८५ | |
| ४. | मांडवी खुर्द | | ३१२, २८३ | ४५००×०.३० | १३५० | ०.१३५ | |
| ५. | मांडवी बुद्रुक | | २४२, २४७, २४५ | ६०००×०.३० | १८०० | ०.१८० | |
| **एकूण वनक्षेत्र (हेक्टर मध्ये)** | | | | | | **०.९७५** | **राखीव वने** |

३. <u>सदर अंतिम मंजूरी खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.</u>

१) वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा बदलणार नाही.

२) प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने दुधखेडा बीट, शहादा रेंज, कंपार्टमेंट नंबर ५८७, तालुका-शहादा, जिल्हा-नंदुरबार येथील २.०० हेक्टर अवनत वनक्षेत्रावर पर्यायी वनीकरण करण्यात यावे.

३) सदर ऑप्टिकल फायबर केबल जास्तीत जास्त १.०० मीटर खोल व ०.४५ मीटर रुंदीच्या चरामध्ये (खंदक) टाकण्यात यावी. सदर केबलवर पीव्हीसी पाईपचे आवरण असावे.

४) प्रकल्पासाठी वापरात आणलेली जमिन प्रकल्प यंत्रणेव्दारे पूर्वस्थितीत आणली जाईल, अशा आशयाचे हमीपत्र प्रकल्प यंत्रणेस सादर करावे लागेल. तसेच, वापरात येणा-या जमिनीकरीता प्रति मीटर रुपये ५०/- या दराने प्रकल्प यंत्रणेस बँकेचे हमीपत्र सादर करावे लागेल. जर संबंधित उपवनसंरक्षक यांच्या मते प्रकल्पासाठी वापरात आणलेल्या जमिनीचे पूर्वस्थितीकरण समाधानकारकरीत्या झाले नसेल, तर त्यापोटीचा खर्च बँकेचे हमीपत्र वटवून वसूल केला जाईल.

५) जर अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या रुंदीमधूनच ऑप्टीकल फायबर केबल टाकावी लागत असेल तर, प्रति मीटर रुपये ३५/- या दराने प्रकल्प यंत्रणेस बँकेचे अतिरिक्त हमीपत्र सादर करावे लागेल. रस्त्याच्या बाजूने होणारे खोदकाम तसेच डांबरी भागाचे झालेले नुकसान पूर्ववत

करणे आवश्यक राहील व यासाठी अनुक्रमे प्रति मीटर रुपये ३००/- व प्रति मीटर रुपये ७५०/- या दराने प्रकल्प यंत्रणेस बँकेचे हमीपत्र सादर करावे लागेल. ऑप्टीकल फायबर केबल टाकताना व भविष्यात त्याची देखभाल करतेवेळी वनक्षेत्राची किंवा पर्यावरणाची झालेली कोणत्याही स्वरुपाची हानी भरुन काढली जाईल, अशा आशयाचे हमीपत्र प्रकल्प यंत्रणेस सादर करावे लागेल.

६) प्रकल्पाच्या भविष्यातील देखभालीच्या कामाकरीता आवश्यकतेनुसार संबंधित उपवनसंरक्षक यांची परवानगी घेणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

७) प्रकल्प प्रस्तावामध्ये ज्या कारणासाठी वनजमिन मागणी केलेली आहे त्या कारणाशिवाय इतर कारणासाठी वनजमिनीचा वापर करता येणार नाही.

८) प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता वृक्षतोड करण्यात येणार नाही.

९) प्रकल्प यंत्रणेस ऑप्टीकल फायबर केबल टाकताना अस्तित्वातील रस्त्यालगतचे मंजूरी नसलेले इतर वनक्षेत्र वापरता येणार नाही.

१०) प्रकल्प यंत्रणेव्दारे प्रचलित दरपद्धतीनुसार पर्यायी वनीकरणापोटी भरण्यात आलेल्या रकमेचा तपशील तसेच दरम्यानच्या कालावधीत नवीन नियमांनुसार भरण्यात आलेल्या इतर रकमांचा तपशील मुख्य वनसंरक्षक (प्रा.), धुळे सादर करतील.

११) सदर प्रकल्पाकरीता माहिती व तंत्रज्ञान विभागाची अंतिम मान्यता व राज्य महामार्ग क्र.१, (शहादा ते धडगांव) ची मंजूरी या अटीच्या अधीन राहून अंतिम मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१२) प्रकल्पाकरीता वनजमिन वापरल्यानंतर प्रकल्प यंत्रणा वनजमिन पूर्ववत करेल.

१३) प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रकल्प यंत्रणेकडून भरण्यात येणारी सर्व रक्कम कॅम्पा मध्ये जमा करण्यात यावी व त्याचा तपशील सादर करण्यात यावा.

१४) प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक मंजूरीची आवश्यकता असल्यास प्रकल्प यंत्रणा सदर मंजूरी प्राप्त करून घेईल.

१५) शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटींचे पालन करणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक असेल.

१६) विविध अधिनियम व त्याअंतर्गत तयार केलेले नियम व मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

१७) वरील परिच्छेद-१ मध्ये नमूद केलेल्या केंद्र शासनाच्या सर्व पत्रातील अटी व शर्तींच्या अधीन राहून तसेच शासनाच्या तत्वत: मान्यतेच्या आदेशातील अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणा करेल

याच्या अधीन राहून ही अंतिम मान्यता प्रदान करण्यात आली आहे व त्या अटींचे पालन करणे प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक असेल.

१८) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना योग्य वाटतील अशा इतर अटी.

१९) प्रकल्प यंत्रणेने उपरोक्त अटींची पूर्तता केल्यानंतर मुख्य वनसंरक्षक (प्रा.), धुळे हे वरील पूर्तता झाल्यानंतर प्रत्यक्षात वनजमिन वळतीकरणाची कार्यवाही करतील.

२०) वर नमूद केलेल्या शासनाच्या तत्वत: मान्यता व अंतिम मान्यतेच्या पत्रातील विहित केलेल्या सर्व अटींचे प्रकल्प यंत्रणा अनुपालन करेल. प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत अनुपालन करेल याची मुख्य वनसंरक्षक (प्रा.), धुळे हे खात्री करतील व याबाबतचा अहवाल वेळोवेळी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करतील.

२१) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० व त्याअंतर्गत केलेले नियम आणि मार्गदर्शक सूचना व या आदेशातील अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न करणे हे वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग ठरेल आणि त्याप्रमाणे याबाबत वैधानिक कारवाई करण्यात येईल. उपरोक्त अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (non-compliance) संबंधित वन अधिकारी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत दिनांक २५/१०/१९९२ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांतील कलम १.९ नुसार अहवाल राज्य शासनामार्फत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांना सादर करतील.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१२२११७२९१२०७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: CN = Virendra R Tiwari, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Revenue And Forest Department
Date: 2018.12.21 17:38:14 +05'30'

**( वीरेन्द्र तिवारी )**

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**

**प्रत:-**

१) सचिव, पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७) विभागीय आयुक्त, नाशिक.
८) मुख्य वनसंरक्षक (वन संवर्धन), नागपूर
९) मुख्य वनसंरक्षक (प्रा), धुळे
१०) जिल्हाधिकारी, नंदुरबार
११) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार
१२) उपवनसंरक्षक, शहादा
१३) मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड, मजला क्र.९, मार्केट चेंबर्स-४, २२२, नरिमन पॉईन्ट, मुंबई-४०० ०२१.
१४) निवडनस्ती फ-१० कार्यासन

२. जिल्हाधिकारी, नंदुरबार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार व उपवनसंरक्षक, शहादा यांना निर्देशित करण्यात येते की, वरील आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच त्यांनी वरील आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर तसेच वरील कार्यालय प्रमुखांच्या सूचना फलकावर सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शिले जातील याची खात्री करावी.

३. मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड, मुंबई यांना निर्देशित करण्यात येते की, वन मंजूऱ्यांचे सर्व आदेश, सर्व्हे क्र., गट क्र. त्यांचे प्रत्येकाचे क्षेत्र आणि वैधानिक दर्जा इ. सह आणि शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एक स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत व त्याची प्रत मुख्य वनसंरक्षक (प्रा.), धुळे व उपवनसंरक्षक, शहादा यांना सादर करण्यात यावी.

४. स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, आदेशांची प्रत मिळाल्यापासून ३० दिवसापर्यंत सदर आदेश सूचना फलकावर प्रदर्शित करावे.

**Forest Land-Nandurbar**

Diversion of 0.975 Ha. Reserved Forest land under Forest (Conservation) Act, 1980 in favour of M/s. Reliance JIO Infocomm Ltd, Mumbai for construction of underground Optical Fiber Cable passing within the existing ROW of Shahada to Dhadgaon PWD Road (MSH-1).

# Government of Maharashtra

## Revenue and Forest Department

## Government Order No.: FLD-16A18/CR-172/F-10

Mantralaya, Mumbai - 400 032

Date: 21/12/2018

**Read -**

1. Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur's letter no. Desk-17/NC/II/ID-12598/(30)/248/2018-19, dated 27/04/2018.
2. Government Order of even no. Dated 23/05/2018.
3. Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur’s letter No. Desk-17/NC/II/ID-12598/(30)/1437/2018-19, Dated 19/10/2018.

**Preamble -**

M/s. Reliance JIO Infocomm Ltd, Mumbai has submitted a proposal for Diversion of 0.975 Ha. Reserved Forest land for construction of underground Optical Fiber Cable passing within the existing ROW of Shahada to Dhadgaon PWD Road (MSH-1) in Nandurbar district to the State Forest Department. Government of Maharashtra, vide its Government Order referred at Sr.No.2 above has granted 'in-principle' approval to that proposal. After complying with the conditions laid down in the order of 'in-principle' approval, it was under consideration of the Government to grant 'formal approval' to the above diversion.

**Resolution -**

1. In exercise of powers delegated to the State Governments, vide Government of India’s order no. F.No.11-9/98-FC, dated 16/10/2000 and 07/09/2015, Government of Maharashtra has granted '**in-principle**' approval under Section-2 (ii) of the Forest (Conservation) Act, 1980 for diversion of 0.975 Ha. Reserved Forest land in favour of M/s. Reliance JIO Infocomm Ltd, Mumbai for construction of underground Optical Fiber Cable passing within the existing ROW of Shahada to Dhadgaon PWD Road (MSH-1) in Nandurbar district, vide it's Order referred at Sr.No.2 above to the proposal submitted by Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide his letter at reference Sr.No-1above.

2. Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide his letter referred at Sr.No.3 has submitted the compliance report of the conditions mentioned in 'in-principle' approval resolution. After careful consideration of the compliance

report and in exercise of powers delegated to the State Governments, vide Government of India's orders mentioned hereinabove, This Government is pleased to grant **'formal approval'** to the diversion of 0.975 Ha. Reserved Forest land under Section 2 (ii) of the Forest (Conservation) Act, 1980, for construction of underground Optical Fiber Cable passing within the existing ROW of Shahada to Dhadgaon PWD Road (MSH-1) in Nandurbar district as per the proposal submitted by Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur's letter No. Desk-17/NC/II/ID-12598/(30)/248/2018-19, dated 27/04/2018. The details are as given below:-

| **Sr. No.** | **Village Name** | **District** | **Details of Forest Land** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **Survey No.** | **Length . Width (in Meter)** | **Area (in Sq.m.)** | **Area (in Ha.)** | **Legal Status** |
| 1. | Dara | Nandurbar | 525, 323 | 8500. 0.30 | 2550 | 0.255 | Reserved Forest |
| 2. | Ghatli | | 317, 331 | 4000. 0.30 | 1200 | 0.120 | |
| 3. | Kakarda | | 313, 314, 311 | 9500. 0.30 | 2850 | 0.285 | |
| 4. | Mandvi Kh. | | 312, 283 | 4500. 0.30 | 1350 | 0.135 | |
| 5. | Mandvi Bu. | | 242, 247, 245 | 6000. 0.30 | 1800 | 0.180 | |
| **Total Forest Area (in Ha.)** | | | | | | **0.975** | **Reserved Forest** |

**3. <u>This 'formal' approval is issued subject to the following conditions-</u>**

1) The legal status of the land shall remain unchanged.
2) The Compensatory Afforestation will be raised on 2.00 Ha. of degraded forest land at forest Compt. No.587 of Dudhkheda beat in Shahada Range, Tal-Shahada, Dist-Nandurbar at the cost of Project Authority.
3) The Optical Fiber Cable Line will be laid within maximum size of the trench of 1.00 meters depth & 0.45 meter width with cable line under the PVC pipeline.
4) The land under project will reclaimed by the User Agency for which the agency shall submit a bank guarantee at the rate of Rs.50/- per running meter and an undertaking to that effect shall also be submitted. If the agency fails to reclaim the land to the satisfaction of Deputy Conservator of Forests concerned, the cost for reclamation will be covered from the bank guarantee.
5) If the cable is going to be laid in the formation width of the road, then additional charges in form of bank guarantee shall be given at the rate of Rs.35/- per running meter. Similarly for reclamation of side drain and for tarred portion, the guarantee will be at the of Rs.300/- per meter and Rs.750/- per meter respectively. An undertaking shall be obtained from the User Agency that it has agreed to make good any loss to Forest/ Environment while laying the cable in the forest area and during maintenance of the same in future.
6) For further maintenance of the project, the agency shall obtain permission from the concerned Deputy Conservator of Forests as and when required.
7) The forest land shall not be used for any purpose other than specified in the proposal.
8) No felling of trees shall done during the implementation of project.

9) No new forest area beyond the Right of Way of existing road should be broken for laying Optical Fiber Cable.
10) The Chief Conservator of Forest (T), Dhule shall report the details of amount recovered from the Project Authority towards the cost of Compensatory Afforestation at prevalent rate and all other cost required as per the rules in due course of time.
11) This sanction is subject to the final clearance by the Department of Information & Technology for the project and Shahada to Dhadgaon PWD Road.
12) The User Agency will make good the land after use/ maintenance.
13) All the amount received from the User Agency under the project shall be transferred to the CAMPA and compliance will be reported to this office.
14) The User Agency will obtain Environment Clearance, if required.
15) Any other conditions stipulated by Government time to time will be binding to User Agency.
16) Provisions of all Acts, Rules made there under and guidelines applicable to the project shall have to be strictly followed.
17) This sanction is granted subject to the compliance of the conditions mentioned in Government of India's letters mentioned in Para-1 and conditions mentioned in the order of in-principle approval by the User Agency and it is mandatory for the User Agency to comply all these conditions.
18) Any other condition which Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur may impose.
19) The actual diversion of forest land shall be effected by the Chief Conservator of Forests (T), Dhule after compliance of all the conditions by the User Agency.
20) The User Agency shall comply with all the conditions stipulated in the 'in-principle' and 'formal approval' letters of Government Orders of Government of Maharashtra. The Chief Conservator of Forests (Territorial), Dhule shall ensure the strict compliance of the conditions by the User Agency and he will furnish the report in this regard to Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur from time to time.
21) Non-compliance of any of the conditions mentioned in this order and Rules and Guidelines made / issued under Forest (Conservation) Act, 1980, shall amount to violation of Forest (Conservation) Act, 1980 and action would be taken accordingly. In case of non-compliance of any of the above conditions, the concerned Chief Conservator of Forests / Deputy Conservator of Forests shall report through the State Government to Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office (WCZ), Ground Floor, East Wing, New Secretariat Building, Civil lines, Nagpur as per procedure laid down in the clause 1.9 of guidelines on 25/10/1992 under the Forest (Conservation) Act, 1980.

3. This Government Order of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 201812211729120719. This Order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: CN = Virendra R Tiwari, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Revenue And Forest Department
Date: 2018.12.21 17:39:31 +05'30'

**( Virendra Tiwari)**
**Additional Principal Chief Conservator of Forests**
**(Mantralaya)**

**Copy to:-**

1. Secretary, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi
2. Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office, West-Central zone, Government of India, Nagpur
3. Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur
4. Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur
5. Additional Principal Chief Conservator of Forests (CAMPA), Maharashtra State, Nagpur
6. Additional Principal Chief Conservator of Forests (Conservation), Maharashtra State, Nagpur
7. Divisional Commissioner, Nashik
8. Chief Conservator of Forests (Forest Conservation), Nagpur
9. Chief Conservator of Forests (T), Dhule
10. Collector, Nandurbar
11. Chief Executive Officer, Zilha Parishad, Nandurbar
12. Deputy Conservator of Forests, Shahada
13. M/s. Reliance JIO Infocomm Limited, 9$^{th}$ Floor, Market Chambers-IV, 222, Nariman Point, Mumbai-400 021.
14. Select File-F-10

2. Collector, Nandurbar, Chief Executive Officer, Zilha Parishad, Nandurbar and Deputy Conservator of Forests, Shahada are hereby directed to forward the copy of this Order to concerned Heads of Local Bodies, Panchayats, Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government and they shall also ensure the display of this order on their notice board as well as on the notice board of local self-government bodies for the information of general public.

3. M/s. Reliance JIO Infocomm Limited, Mumbai are hereby directed that they should publish the entire Order of forest clearances granted in verbatim along with the details of Survey No., Gut No., area and legal status of each Survey, Gut No. etc. and along with the conditions and safe guards imposed by the Government while granting forest clearances in two widely circulated daily newspapers, one in vernacular language and other in English language and submit the copies of newspapers to Chief Conservator of Forests (Territorial), Dhule & Deputy Conservator of Forests, Shahada.

4. Heads of Local Bodies, Panchayats and Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government are hereby directed to display the same on their notice board for 30 days from the date of receipt for the information of general public.